नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग

# राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs mumbai@yahoo.com

क्र. रामविसं/पुगाव/प्र.५/प्र.क्र.१५/१०५ /२०२४

दिनांक ०४ / ०२ /२०२६

## पुस्तकांचे गाव या प्रकल्पांतर्गत भिलार, जि. सातारा येथील दालनांसाठी पुस्तक खरेदीसाठी दरपत्रके मागविण्याबाबतची सूचना.

१. राज्य मराठी विकास संस्थेंतर्गत कार्यान्वित पुस्तकांचे गाव योजने अंतर्गत भिलार, जि. सातारा येथील दालनांमध्ये ठेवण्यासाठी पुस्तके खरेदी करावयाची आहेत.

२. दालनांमध्ये प्रती दालन ८०० ते १००० पुस्तके ठेवावयाची असून प्रत्येक दालनामध्ये साहित्यप्रकारानुसार पुस्तके ठेवायची आहेत.

३. भिलार, जि. सातारा येथील दालनांमध्ये ठेवण्यासाठी पुढील साहित्यप्रकारांनुसार पुस्तकांचा समावेश असावा. १. अनुवादीत साहित्य, २)परिवर्तन चळवळ, ३)कोष आणि सुची वाङमय, ४) शौर्य - धैर्य आणि ५) शासकीय प्रकाशने.

पुस्तकांचं गाव भिलार येथील दालनांमध्ये ठेवण्यासाठी उपरोक्त दिलेल्या साहित्यप्रकारांनसुार पुस्तक खरेदी निधीच्या उपलब्धतेनुसार करावयाची आहेत. त्याकरिता पुस्तक पुरवठादारांकडून दरपत्रके मागवून खरेदी प्रक्रीया राबवायची आहे. खालील नमून्यात पुस्तक सवलत दर सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | पुस्तकांची संख्या | भाषा | पुस्तकांच्या मूळ छापील किंमतीवर देण्यात येणारी सवलत (टक्केवारीत) |
|---|---|---|---|
| १ | ठोक संख्या - ५००० (अंदाजित) | मराठी | |
| २ | प्रती पुस्तक प्लॅस्टिक कव्हर लावण्यासाठीचा दर | | |

सदर संबंधित /पुस्तके विक्रेत्यांकडून, वितरकांकडून, प्रकाशन संस्था, लेखक, कवी यांच्याकडून राज्य मराठी विकास संस्थेच्या पुस्तकांचे गाव या प्रकल्पांतर्गत असणाऱ्या दालनांकरता किती कमाल सवलत दर देऊ शकतील, याबाबतचे दरपत्रक/निविदा मागविण्यात येत आहेत.

पुस्तके सवलत दराकरीता दरपत्रक/निविदासोबत खालील साक्षांकित छायाप्रतींसह जोडण्यात यावेत.

१. २५% पेक्षा अधिक सवलत नमूद करणे बंधनकारक आहे.

२. पुरवठा करण्यात येणारी पुस्तकांची विषयनिहाय/साहित्यप्रकार यादी व किंमतीसह जोडणे बंधनकारक राहील.

३) PAN/TAN Card प्रत जोडणे आवश्यक आहे.

४) मागील ३ वर्षाचे आयकर भरलेले प्रमाणपत्र प्रमाणित केलेले जोडणे आवश्यक राहील.

५) सदर पुस्तके सवलत दरामध्ये सर्व खर्चासह समावेश असावा.

६) शॉप परवाना किंवा कंपनी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात यावी.

७) सोबत जोडलेल्या पुस्तकांच्या यादीतील किमान ७५ % पुस्तके उपलब्ध असणे बंधनकारक राहील.

८) कमाल सवलत (Discount) देणाऱ्या वितरण संस्था, प्रकाशन संस्था यांच्याकडील उपलब्ध पुस्तकांमधून संस्थेची पुस्तक निवड समिती पुस्तकांची निश्चिती करेल.)

९) राज्य मराठी विकास संस्था निश्चित करेल त्या यादीप्रमाणे निश्चित केलेल्या पुरवठादारास पुस्तकांचा पुरवठा भिलार, ता. महाबळेश्वर, जि. सातारा या ठिकाणी करावा लागेल, यासाठी वेगळा वाहतूक खर्च दिला जाणार नाही.

१०) प्रत्येक पुस्तकावर राज्य मराठी विकास संस्थेचा लोगो/शिक्का स्टॅम्प स्वरूपात मारण्याचे काम पुरवठादारास करावे लागेल तसेच प्रत्येक पुस्तकास प्लॅस्टीक कव्हर(पारदर्शक) लावणे बंधनकारक राहील.

११) राज्य मराठी विकास संस्थेकडे खरेदीच्या वेळी पुस्तकांची संख्या कमी जास्ती करण्याचे अधिकार असतील.

सवलतीच्या दराच्या आधारे अंतिम पुरवठादाराची निवड करताना खालील बाबींचा विचार करून त्यानुसार कमाल सवलतीचा दर निश्चित केला जाईल.

१) ज्या पुरवठादाराचा सवलतदर कमाल असेल त्यांच्याकडील उपलब्ध पुस्तकांच्या यादीतून पुस्तक निवड समितीने निवड केलेल्या पुस्तकांची संख्या कमी झाल्यास त्यांना कमाल दराने सवलत द्यावी लागेल. याबाबतच्या निर्णयात मा. संचालक, राज्य मराठी विकास संस्था हे सक्षम अधिकारी राहतील.
२) कमाल सवलत देणाऱ्या पुरवठादाराने पुरेशी पुस्तके उपलब्ध न करून दिल्यास अन्य पुरवठादार ज्यांनी या निविदा प्रक्रियेत भाग घेतला असेल त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या पुस्तकांच्या यादीतून निवड केली जाईल. त्यासाठी कमाल सवलत देणाऱ्या पुरवठादाराच्या सवलतीच्या दरानुसार दर लागू होतील.

सदर पुस्तके खरेदीचे दरपत्रक दि.१३ / ०२ /२०२६ पर्यंत प्राप्त होतील अशा बेताने राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई – ४०० ००१ यांच्याकडे समक्ष अथवा पोस्टाने पाकीटावर "भिलार येथील पुस्तक खरेदीवरील सवलत दर दरपत्रक" अशी नोंद करून पाठवावी. या तारखेनंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

विहित मुदतीत प्राप्त दरपत्रके दि. १३ /०२/२०२६ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत उघडण्यात येतील. संबंधितांनी स्वखर्चाने राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई – ४०० ००१ येथे उपस्थित रहावे. मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी वरील पुस्तकांच्या किंमतीवर तुलनात्मक दृष्ट्या संख्यानिहाय जो जास्तीत जास्त सवलतदर असेल तो विचारपूर्वक, चर्चेतून, वस्तुनिष्ठ पद्धतीने निश्चित केला जाईल.

राज्य मराठी विकास संस्थेस प्राप्त झालेल्या दरपत्रकांच्या आधारे पुस्तके विक्रेत्यांची किंवा वितरकांची, प्रकाशन संस्थांची निवड करण्यात येणार नसून सवलतीचा कमाल दर विचारात घेऊन निवड निश्चित करण्यात येणार आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच दरपत्रक स्वीकारणे वा कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर नाकारणे हे सर्व अधिकार मा. संचालक, राज्य मराठी विकास संस्था यांना राहतील.

(डॉ. शामकांत देवरे)

संचालक

राज्य मराठी विकास संस्था